# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २५९** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.३०/०४/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४७ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.३०/०४/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४७ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.३०/०४/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४७ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-२६०** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/१७/२०२५-२६ दि.१३/०५/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.२४/०४/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.२५/०४/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.३०/०४/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे बाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पंप ऑपरेटर यांच्या दि.२३/०४/२०२५ चे रिपोर्टनूसार म.न.पा. वाहनांसाठी डिझेलसाठा ४०७५ लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांनी मागणी क्रं.१४११३ दि.२३/०४/२०२५ अन्वये १२,००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजार भाव) व बल्क दर या दोघामध्ये जो पर्यंत फरक राहील तो पर्यंत बाजार भावातून किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचे दर प्रति लिटर एकुण रक्कम रु.९२.०३ मात्र आहेत.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.०२/०४/२०२४ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२४-२५/१५ दि.२३/०४/२०२५ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन १२००० लिटर किरकोळ डिझेल खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-२६१** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. समन्वय अधिकारी, प्र.स.क्र.०१ ते ०४ यांचेकडिल जा.क्र./प्र.स.क्र.०१ ते ०४/५५५/२०२५-२६ दि.२६/०५/२०२५
३. समन्वय अधिकारी, प्र.स.क्र.०१ ते ०४ यांचा दि.१७/०४/२०२५ चा अभिप्राय
४. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय
५. उपायुक्त यांचा दि.१५/०५/२०२५ चा अभिप्राय
६. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२२/०५/२०२५ चा अभिप्राय
७. आयुक्त यांचा दि.२२/०५/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ च्या हद्दितील मिळकतींचे मालमत्ताकराचे वार्षीक देखभाल दुरुस्तीचे (Annual Maintenance) कामाकरीता बाहय अभिकर्ता नेमणे कामी ई निविदा क्र.०१/२०२४-२५ अन्वये मे.स्थापत्य कन्सलटन्टस अमरावती यांचे दर स्विकृत करुन कार्यादेश निर्गमित करणेस मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व समन्वय अधिकारी, प्र.स.क्र.०१ ते ०४ यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ च्या हद्दितील मिळकतींचे मालमत्ताकराचे वार्षीक देखभाल दुरुस्तीचे (Annual Maintenance) कामाकरीता ई निविदा क्र.०१/२०२४-२५ ही शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार विहीत कार्यवाही पुर्ण करुन प्राप्त दोन निविदांचे दि.१७/०२/२०२५ रोजी लिफाफा क्र.०१ (तांत्रीक लिफाफा) उघडण्यात आले होते. छाननी अंती निविदा समितीच्या शिफारसीने व आयुक्त यांचे मान्यतेने Sthapatya consultants (Ind) Pvt. Ltd. यांनी सादर केलेली कागदपत्रे निविदेतील अटी शर्तींची पुर्तता करणारी त्यांचा लिफाफा क्र.२ उघडण्यास पात्र ठरविण्यात आले व ORNET Technologies Pvt Ltd यांनी सादर केलेली कागदपत्रे अपुर्ण व निविदेतील अटी शर्तींची पुर्तता करणारी नसल्याने त्यांचा लिफाफा क्र.२ उघडण्यास अपात्र ठरविण्यात आले. त्याअन्वये Sthapatya consultants (Ind) Pvt. Ltd. या निविदाकारचे लिफाफा क्र.२ उघडण्यास मान्यता दिलेली होती. त्यामुळे दिनांक ०३/०३/२०२५ रोजी Sthapatya consultants (Ind) Pvt. Ltd. या निविदाकारचे लिफाफा क्र.२ (फायनान्सीयल बिड) उघडले असता त्यांनी दिलेले दर प्रथमदर्शनी जास्त वाटत असल्याने प्रस्तुत प्रकरणी संबंधीत कंपनी मे.स्थापत्य कन्सलटन्टस् अमरावती यांना दि.१२/०३/२०२५ रोजी आयुक्त यांचे दालनांत वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आलेले होते. सदर वाटाघाटीस दि.१२/०३/२०२५ रोजी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सदर वाटाघाटीनंतर त्यांनी पत्र सादर केले असुन सदर पत्र दि.२०/०३/२०२५ रोजी प्राप्त झाले असुन त्यांनी खालील तक्त्यातील Sr.No.१ मध्ये नमुद कामासाठी दरकमी करुन काम करण्यास तयार असले बाबत नमुद केलेले आहे.

| Sr.No. | Particular | Unit | Tender Rates | Revised Rates |
|---|---|---|---|---|
| १ | Providing Annual Operation & maintenance and Supply for the property and water tax dept as providing yearly tax collection postings, Bills of taxes, demand registers and collection register etc with pre-printed multicolour stationary and maintaining the database, Manpower requirement for Operations & Maintenance etc. | Per Property per year | Rs.१७०/- One Hundred seventy only | Rs.१३०/- One Hundred thirty only |

म्हणजेच वाटाघाटीनंतर खालील प्रमाणे दरांत काम करणेस सहमती दर्शविलेली आहे.

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | STHAPATYA CONSULTANTS INDIA PVT. LTD. (GSTN-२७AARCS६९१४M१ZJ) BID ID -६४५१७३६ | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount |
| १.०० | Providing Annual Operation & maintenance and Supply for the property and water tax dept as providing yearly tax collection postings, Bills of taxes, demand registers and collection register etc with preprinted multicolor stationary and maintaining the database, Manpower requirement for Operations & Maintenance etc as per tender document scope of work for ३ Years as per section (६A and ६B) | १.०० | Per Property and Per Water Connection Unit Per Year | १३०.००० | १३०.००० |
| २.०० | Maintainance of the all above software and the Database, installation-reinstallation as Required by Jalgaon Municipal Corporation, Upgradation of Software and Database for reconciliation of the Next Financial year for one year as per section(६C) | १.०० | Per Year | १००००००.००० | १००००००.००० |
| ३.०० | Providing services for door to door Survey and property tax assessment for supplementary assessment of newly constructed properties. | १.०० | Per Property | ७७०.००० | ७७०.००० |
| ४.०० | Providing License based data services to maintain and manage data of Jalgaon Municipal Corporation related to property tax department on agency's data center for various online activities related to property tax software and application as a host server and database server as data center with appropriate backup system at selected agency office as per section mentioned in the tender doc (६D) .(If and As Ordered) | १.०० | Per Year | १८०००००.००० | १८०००००.००० |
| | Total in Figures | | | | २८००९०० |

उक्त प्रमाणे नमुद केलेले दर शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ मधील नियम क्रमांक ४.४.३.१ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार स्विकृत करता येतील, तसेच सदरचे काम प्रशासक महासभा ठराव क्र.२७, दि.०७/१२/२०२३ अन्वये सदरच्या पुढील तीन वर्षासाठी म्हणजेच सन २०२४-२५ ते २०२६-२७ पर्यंत मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र त्यांपैकी सन २०२४-२५ हे आर्थिक वर्ष संपलेले असल्याने सदरचे काम सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या वर्षाकरीता व उक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे दर स्विकृत करुन मे.स्थापत्य कन्सलटन्टस् अमरावती यांना कार्यादेश देणेसाठी मान्यता मिळण्यासाठी समन्वय अधिकारी, प्र.स.क्र.०१ ते ०४ यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी. लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत व कायदेशीर अडचणी निर्माण होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४८** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:-२६२** **दिनांक :-२७/०५/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. मुख्य लेखापरिक्षक यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सा.अहवाल/मुलेप/०४/२०२५ दि.०६/०५/२०२५

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) (अ) अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०३/०२/२०२५ ते दि.३१/०३/२०२५ (एकूण - ०९ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) (अ) अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०३/०२/२०२५ ते दि.३१/०३/२०२५ (एकूण - ०९ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल मुख्य लेखापरिक्षक विभागाने माहीतीसाठी सादर केलेला आहे.

उपरोक्त वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार लेखा लेखापरिक्षण विभागाने सादर केलेल्या लेखा तपासणी कामाच्या अहवालाची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**